(14)

# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
Fax २२६६१२३९, Tel. २२६६५२३३, Email : collector_mumbaicity@maharashtra.gov.in
**(भूमापन व भूमि अभिलेख शाखा)**

क्रमांक : सीएसएलआर/एसॲण्डएलआर-१ व २/टे-१/कांदळवन तक्रारी/२०१९
दिनांक : 22/०४/२०१९ जा. क्र. 633

प्रति,

मा.विभागीय आयुक्त,
कोकण विभाग, कोकण भवन,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.

**विषय** :- कांदळवन संरक्षण व संवर्धन
कांदळवनाचे ऱ्हासाबाबतची संयुक्त पहाणी करणेबाबत.
श्री. एश्ले लोबो यांचा दि. 02/12/2018 रोजीच्या ई-मेलव्दारा प्राप्त तक्रारीनुसार.
Mangroves being cut and house being build at bandra.

**संदर्भ** :- 1) मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडील पत्र क्र. सी/कार्या-2/आय/टे-8/कावि. – को.स.कां.त./18 दि. 14/01/2019 रोजीचे पत्र. (E-mail व्दारे प्राप्त दि. 27/02/2019)
2)सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेकडील पत्र क्र. कक्ष – 1/ल.ले/167/सन2018-19 फोर्ट, मुंबई 400 001. दि.10/12/2018.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक ३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेला निर्णय व त्यातील रूपांतरीत जनहित यांचिका क्रमांक ८७/२००६ मध्ये दिनांक २७/०१/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने श्री. एश्ले लोबो, यांनी दि.०२/१२/२०१८ रोजी कांदळवनाच्या/ पाणथळाच्या ऱ्हासाबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करून, केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

## कांदळवन तक्रारीचा पुर्तता अहवालाचा नमुना

| अ.क्र. | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| १. | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्री. एश्ले लोबो दि. ०२/१२/२०१८. |
| २. | तक्रारीचा विषय | Mangroves being cut and house being build at bandra. |
| ३. | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशील उदा.स.नं., गावाचे नांव, तालुका. | माहिम महसुल विभाग. |
| ४. | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम | तक्रारीच्या अनुषंगाने दि.२०/०३/२०१९ रोजी या कार्यालयातील श्री.बी. व्ही तोरस्कर, परिरक्षण भूमापक, कांदळवन संधारण घटक मध्य मुंबई यांचेकडील श्री. र. र. मन्सूरी (वनपाल दादर / कुलाबा) व डी. एल. झुगरे (वनरक्षक दादर) |
| ५. | चौकशीमध्ये आढळून आलेली वस्तुस्थिती | उपरोक्त विषयांकित कामी दि.20/03/2019 रोजी श्री. डी. एल. झुगरे, वनरक्षक दादर व श्री. र. र. मन्सूरी, वनपाल, |

Received 22/4/19

| | | |
|---|---|---|
| | | दादर/कुलाबा यांचे समवेत या कार्यालयातील प.भू. श्री. बी. व्ही. तोरस्कर हे माहिम धारावी (ब्रीज) पुलावर संयुक्त स्थळ पहाणीसाठी एकत्र आलो. परंतु तक्रार अर्जदार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी हे हजर राहीले नसल्याने नक्क कोणते ठिकाण हे कळू शकले नाही.<br>तक्रार अर्जदार श्री. एश्ले लोबो यांनी Mangroves being cut and house being build at Bandra अशी तक्रार ई-मेल व्दारे प्राप्त झालेली असून, त्यावर त्यांचा पत्ता दूरध्वनी क्रमांक किंवा भ्रमणध्वनी क्रमांक नमूद केलेला नसल्यामुळे तक्रारदार यांचेशी संपर्क साधता आला नाही. त्यामुळे स्थळपहाणी करता आली नाही. |
| ६. | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | नाही. |
| ७. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधित पोलिस स्थानकाचे नांव | --- |
| ८. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तिंची नांवे व पत्ता | --- |
| ९. | कोणत्या कायद्याअंतर्गत/कलमाअंर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | --- |

सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे कार्यवाही करणेत आली असून, यासोबत पंचनामा पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर केलेला आहे.

(शिवाजी जोंधळे)
**जिल्हाधिकारी, मुंबई शहर**

**प्रत :-**

1) सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय.302, वेक फिल्ड हाऊस, 3रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट, मुंबई-400 001.

# स्थळ पहाणी अहवाल

59/2019

भूमापन शाखा
दि.30/03/2019

सविनय सादर,

**विषय :-** कांदळवन सरंक्षण व संवर्धन.
कांदळवनाचे ऱ्हासाबाबतची संयुक्त स्थळपहाणी करणेबाबत.

**संदर्भ :-** या कार्यालयाकडील ज्ञाप क्र. सीएसएलआर/एसअँन्डएलआर /1 व 2 /टे-1/ कांदळवन ऱ्हास / संयुक्त स्थळपहाणी /2019 दि. 06/03/2019 चे पत्र.

उपरोक्त विषयांकित कामी दि. 20/03/2019 रोजी वनरक्षक दादर वनरक्षक कुलाबा व वनपाल श्री. र. स. मन्सूरी यांचे समवेत माहिम धारावी (ब्रीज) पुलावर संयुक्त स्थळ पहाणीसाठी एकत्र आलो. परंतु तक्रार अर्जदार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी हे हजर राहीले नसल्याने नक्क कोणते ठिकाण हे कळू शकले नाही.

तक्रार अर्जदार श्री. एश्ले लोबो यांनी Mangroves being cut and house being build at Bandra अशी तक्रार ई-मेल व्दारे प्राप्त झालेली असून, त्यावर त्यांचा पत्ता दूरध्वनी क्रमांक किंवा भ्रमणध्वनी क्रमांक नमूद केलेला नसल्यामुळे तक्रारदार यांचेशी संपर्क साधता आला नाही. त्यामुळे स्थळपहाणी करता आली नाही.

वरीलप्रमाणे वस्तूस्थिती माननीयांचे अवलोकनार्थ सविनय सादर.

सोबत :- जागेवरील पंचनामा सादर असे.

30/3/2019
बी. व्ही. तोरस्कर
(परिरक्षण भूमापक)

जिल्हाधिकारी कार्यालय
महसुल शाखा / नगर भुमापन शाखा
आवक क्रमांक :- 2579
दिनांक 1/4/2019
अधिक्षक

Bhumapan Shakha1/ P-7 /Sathal Pahani Ahval fill /all Sathal Pahani Ahval letter /2016

दिनांक - 20/03/2019

# पंचनामा

मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर, यांचे कार्यालयातील परि. भूमापक यांचे समोर, आम्ही खाली सह्या करणार पंच लोक स्थळ माहिम, मुंबई. माहिम-सायन (ब्रिज) पुला जवळ आज दिनांक 20/3/2019 रोजी विचारले वरून सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो की-

मा. अपर प्रधान मुख्य संरक्षक, कांदळवनकक्ष मुंबई यांचे कार्यालयाकडील पत्र श्री. एरल लोबो यांचे तक्रारीचे अनुषंगाने माहिम-सायन त्या ब्रिज नजीक भागात गेलो. परंतु तक्रारदार अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित न राहिल्याने त्यांनी तक्रारीत नमूद केले ठिकाण कोणते हे समजू शकले नाही. म्हणून लिहून दिला पंचनामा

समक्ष

20/3/2019
(बी.डी. तोरस्कर)
परि. भूमापक

20/03/2019
र.र. मन्सुरी
(वनपाल)

20/3/2019
www.BCPA.in

व. र. दाभर
कांदळवन कक्ष मुंबई.

व. र. कुलकर्णी
कांदळवन कक्ष मुंबई.